जा.क्र.आर/४०५/समिती बै./4536 /१७,
पोलीस अधीक्षक कार्यालय,ठाणे ग्रामीण.
दिनांक :- ३०/११/२०१७

प्रति,

मा. पोलीस अधीक्षक सो,
ठाणे ग्रामीण

**विषय** :- न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारसी करण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या बैठकिच्या तपशिलाबाब.

**संदर्भ** :- शासन परिपत्रक क्रमांक डीपीपी-२०१५/प्र.क्र.५१/पोल-१०, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ अन्वये

-o-o-o-o-o-

उपरोक्त विषय व संदर्भान्वये पत्रास अनुसरुन गठित करण्यात आलेल्या समितीची आज रोजी दिनांक ३०/११/२०१७ रोजी सायंकाळी आमचे दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकिकरीता नेमण्यात आलेले सदस्य श्रीमती व्ही. एस. जाधव, सहा. सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, ठाणे, पोलीस निरीक्षक श्री. व्हि. आर. आंधळे, स्थागुशा हे सदस्य म्हणुन हजर होते. सदर बैठकितील चर्चेत श्रीमती ज्योत्स्ना काळण, विधी अधिकारी गट- ब, ठाणे ग्रामीण यांनाही बोलाविण्यात आले होते.

बैठकिदरम्यान माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१७ या कालावधीत निकाली निघालेल्या केसेसचा आढावा घेण्यात आला. सुटलेल्या एकुण २७ केसेसच्या निकालाच्या प्रतींचा अभ्यास केला असता प्रकर्शाने जाणवलेल्या केसेस म्हणजे १) नवघर पोस्टे I ३५/१० एनडीपीएस २०, २२ २) किन्हवली पोस्टे ७/१२ भादवि ३०२, २०१ ३) गणेशपुरी पोस्टे I ७१/१५ भादवि ३०२, ३४ ४) मुरबाड पोस्टे I ९४/०१ भादवि ३०७ हया चार केसेस आहेत. करिता चारही केसेस तपासी अधिकारी यांच्या चुकीमुळे, हलगर्जिपणामुळे निर्दोष मुक्त झाल्याचे चर्चेदरम्यान निदर्शनास आले आहे. नमुद चारही केसेसचा निकाल पुढीलप्रमाणे.

## सुटलेल्या केसेस :-

| अ.क्र. | मुद्दा | विवरण |
| --- | --- | --- |
| १ | पोलीस ठाणे | नवघर |
| २ | निकाल लागलेले गुरनं व कलम | I ३५/१० एनडीपीएस २०, २२ |
| ३ | सरकारी अभियोक्ताचे नांव | श्रीमती वर्षा चांदणे |
| ४ | तपासीक अंमलदार | पोनिरी राजेंन्द्र मोहिते |
| ५ | से.के.नं. | २८/२०१० |
| ६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक | १६/१०/२०१० |
| ७ | निकाल दिनांक | २२/०९/२०१७ |
| ८ | सुटल्याचे कारण | १) एनडीपीएस ४२ व ५० ची अंमलबजावणी केलेली नाही.<br>२) कोर्टात सादर करण्यात आलेल्या कलम ५० च्या नोटीशीमध्ये कुठेही "हक्क" हा शब्द न आल्याने कलम ५० नुसार अंमलबजावणी झाली की नाही हे सांगणे कठिण असलेबाबत मा. न्यायालयाने निकालपत्रात शंका उपस्थित केली आहे.<br>३) गांजा बाळगण्याचा आरोपीकडे कोणत्याही प्रकारचा परवाना नाही. |
| | तपीसक अंमलदार यांची तपासकामातील चुकि | एनडीपीएस कलम ४२ व ५० नुसार अंमलबजावणी केली नाही. तपासामध्ये गुन्हा सिध्द करण्यासाठी तपासीक अंमलदार यांनी पुरेसे पुरावे रेकॉर्डवर आणले नसल्याचे दिसुन येते. |

| .क्र. | मुद्दा | विवरण |
| --- | --- | --- |
| १ | पोलीस ठाणे | किन्हवली |
| २ | निकाल लागलेले गुरनं व कलम | I ७/१२ भादवि ३०२, २०१ |
| ३ | सरकारी अभियोक्ताचे नांव | श्री. भोईर |
| ४ | तपासीक अंमलदार | १) पोनिरी मिसर , २) पोनिरी अनिल शिंदे ३) गुरनं I ६/१२ मध्ये तपासकामात पोउपनिरी सारंग यांना आरोपीत जगन याने त्याची पत्नी गिरीजा हिचा ४ वर्षापुर्वी खुन करुन तिचे शव लपवुन ठेवल्याची कबुली दिल्याने गुरनं नं. I |

| | | |
|---|---|---|
| | | ७/१२ दाखल करण्यात आला. |
| ५ | से.के.नं. | १५२/१२ |
| ६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक | ११/०६/२०१२ |
| ७ | निकाल दिनांक | १४/०९/२०१७ |
| ८ | सुटल्याचे कारण | १) मयत गिरीजा हरविलेबाबत कोणत्याही पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केलेली नाही. अथवा कोणीही त्याबाबत ४ ते ५ वर्षाच्या काळात तिच्याबद्दल विचारणाही केलेली नाही. मयताचे शव आरोपीने घरामागे गाडले त्यासंदर्भात अधिक पुरावाकामी आजुबाजुचे शेजारी यांचेकडे तपासी अंमलदार यांनी चौकशी केली नाही. तसेच गुन्हा घडण्यापुर्वी मयत व आरोपीत यांना शेवटी एकत्र कोणी पाहिल्याबाबत कोणीही साक्षीदार निष्पन्न केलेले नाहीत.<br>२) भापुकाक २७ नुसार हत्यार जप्त झालेले नाही.<br>३) आरोपीने दिलेला कबुली जबाब हा तपासीक अधिकारी यांनी स्पेशल एक्झिक्युटीव्ह मॅजिस्टेट यांचे समक्ष नोंदविल्याने ते एक्स्ट्रा ज्युडिशिअल कन्फेक्शन होत असतांना एससीओ यांनी आरोपीत याने दिलेल्या जबाबातील मजकुर सांगण्यास टाळाटाळ केल्याचे मा. न्यायालयाने निकालपत्रात नमुद केले आहे.<br>४) मा. न्यायालयात मयताला गुंडाळलेल्या साडीचे रंगाबाबत त.अंमलदार, साक्षीदार यांचे साक्षीमध्ये विसंगती आल्याने जप्त केलेल्या वस्तुमध्ये शंका निर्माण झाल्याचे मा. न्यायालयाने स्पष्ट नमुद केले आहे.<br>५) शव हे स्त्रीचे आहे याबाबत सीए अहवालात निष्कर्ष आलेला नाही.<br>६) आरोपीत यानेच तिला मारल्याबाबतचा उद्देश सिध्द होत नाही. तसेच ईतर सह आरोपी यांचे विरुध्द गुन्हयात सहभागी असलेबाबत कोणताही पुरावा नाही. |
| | तपीसक अंमलदार यांची तपासकामातील चुकि | १) तपासीक अधिकारी यांनी गुन्हयाचे तपासकामात जप्त केलेल्या मयताला गुंडाळलेल्या साडीच्या रंगाचे वर्णन हे कोर्टात साक्षीकामी वेगळया रंगाचे दिल्याने तपास योग्य प्रकारे केलेला नाही. असे कोर्टाचे मत झाले.<br>२) सदर केसमध्ये आरोपीत ही ४ वर्षापासुन बेपत्ता असलेबाबत कोणीही तक्रार केली नव्हती. आरोपीत याने त्याच्या घराच्या मागे मयताचे शव गाढले त्यासंदर्भात अधिक पुरावाकामी आजुबाजुचे शेजारी यांचेकडे तपासीक अंमलदार यांनी चौकशी करणे आवश्यक होते ते केलेले नाही.<br>३) तपासीक अधिकारी यांनी ईतर सह आरोपी यांचे विरुध्द गुन्हयात सहभागी असलेबाबत कोणताही पुरावा घेतलेला नाही.<br>४) आरोपीत यानेच गुन्हा केला त्याचा नेमका उद्देश काय होता याबाबत तपास करुन पुरेसे पुरावे प्राप्त करणे आवश्यक असतांना तपासीक अंमलदार यानी तसे केले नसल्याचे दिसून येते. |

| अ.क्र. | मुद्दा | विवरण |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | **गणेशपुरी** |
| २ | निकाल लागलेले गुरनं व कलम | I ७१/२०१५ भादविसंक ३०२,३४ |
| ३ | सरकारी अभियोक्ताचे नांव | श्रीमती हिवराळे |
| ४ | तपासीक अंमलदार | सपोनि/जी.के.मातोंडकर |
| ५ | से.के.नं. | ५१६/१५ |
| ६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक | १७/१२/२०१५ |
| ७ | निकाल दिनांक | २३/०८/२०१७ |
| ८ | सुटल्याचे कारण | १) सदर गुन्हयातील साक्षीदार, वैदयकिय अधिकारी, तपासीक अंमलदार, पंच यांना तपासण्यात आले आहे.<br>२) आरोपीच्या ताब्यातुन मिळालेल्या हत्यारांवर रक्ताचे डागांचे स्पष्टीकरण नाही. तरी सुध्दा आरोपी यांचेकडुन जप्त केलेले कपडे त्याच्यावरसुध्दा रक्ताचे डाग असल्याने सदरची केस ही परिस्थितीजन्य पुराव्याच्या आधारे सिध्द होत असल्याचे अभियोग पक्षाचे म्हणणे होते. त्यावरुन आरोपींना शिक्षा होण्यास अभियोग पक्षाने विनंती केली.<br>३) आरोपी क्र. १ हा त्याचे बायकोवर संशय घ्यायचा. तिचे मयताबरोबर लग्नबाहया संबंध असल्याचे कारणावरुन त्याने सदरचा गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने म्हंटले आहे.<br>४) पंच यांचे क्रॉसमध्ये बचाव पक्षातर्फे अभियोग पक्षाने जरी मेमोरंडमचा आधार घेतला असला तरी पंचांच्या क्रॉसमध्ये त्यासंदर्भात अवलंबून रहाता येत नाही. पंचांनी मान्य केले की, हत्यार जप्त व्हायच्या आधी पोलीस ठाण्यांत मेमोरंन्डम पंचनामा झाला नाही. यावरुन मेमोरंन्डम प्रत्यक्षपणे पोलीसांनी केल्याचे दिसुन येत नाही. आरोपीवर दबाव आणुन त्याकडुन सादर करुन घेतले याबाबत स्पष्ट होते. यावरुन पंचांच्य समक्ष पंचनामा झाला नसल्याने अभियोग पक्षाला सदरच्या पुराव्यात पुष्टी देत नाही.<br>५) गुन्हयात रक्ताने माखलेली हत्यार ही जप्त केल्यानंतर जवळ जवळ १७ दिवस पोलीस ठाण्यात पडून होती याबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. तसेच हस्तगत केलेला मुद्देमाल कोठे ठेवला, कोणाच्या ताब्यात ठेवला व तात्काळ न्यायवैदयकिय प्रयोगशाळेत का पाठविला नाही. याबाबत कोणतेही स्पष्टीकरण नाही. सदरबाबत संशय निर्माण होऊन त्याचा फायदा कायदयानुसार आरोपीला मिळत असुन पंच, साक्षी, तपासीक अंमलदार यांच्या व्यतिरिक्त साक्षीदार तपासलेले नसल्याने त्याचा संबंध आरोपीशी लावता येत नाही.<br>६) आरोपीची बायको व मयत यांच्यामध्ये प्रेमसंबंध असले कारणाने आरोपी याने |

| | | |
|---|---|---|
| | | मयतास मारले व त्याबाबतचा उद्देश सिध्द होणेकामी साक्षीदार तपासलेला नाही.<br>७)तपासीक अंमलदार यांनी बायकोचे टिपण नोंदविले नाही. टिपण नोंदविणे आवश्यक असतांना अभियोग पक्षाचे मदतीकामी व उद्देश सिध्द होणेकामी तिचा जबाब नोंदविणे आवश्यक असतांना तसे केले नाही. तसेच तपासीक अंमलदार यांनी उद्देश सिध्द होणेकामी अशा प्रकारची साक्ष घेणेकामी कोणतीही काळजी घेतली नाही. त्यासंदर्भात त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या State of Maharashtra V/s Gorakh Ambaji Adsul and Hardan Das V/s State of West Bengal केस लॉ घेऊन संशयाच्या पलिकडे जाऊन घटनास्थळाची साखळी आवश्यक असुन आरोपीची अपराधीपणाची भावना सिध्द होण्यास पुरक आहे. आणि त्याच्या निष्पापपणाशी पुर्णपणे विसंगत होऊ शकतो. त्यामुळे सदर केसच्या आधारावरती अभियोग पक्षाने हा गुन्हा सिध्द होऊ शकत नसल्याचे म्हणने मांडले..<br>८) वैदयकिय अधिकारी यांनी दिलेल्या साक्षीत मयतास झालेल्या जखमाने त्याचा मृत्यु नैसर्गिक नसल्याचे सांगितले.<br>९) प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याने साक्षीदार हे तयार केल्याचे वाटत आहेत. त्यामुळे सदोष मनुष्यवध आहे की नाही हे सिध्द होत नाही. गुन्हयाचा हेतु अभियोग पक्ष सिध्द करुन शकला नाही.<br>१०) आरोपी क्र. १ याने निवेदन दिले की तो हत्यार काढुन देतो पंचांचे साक्षीत आरोपी हा त्याचे घरी घेऊन गेला तिथे त्याने रक्ताने माखलेला कोयता काढुन दिला. त्याच्या समक्ष पोलीसांनी मुद्देमाल जप्त केला. अभियोग पक्ष युक्तिवादामध्ये आरोपी क्र. २ व ३ यांच्याशी संबंध जोडु शकत नाही. कोणताही साक्षीदार आरोपी क्र. १ सोबत घटनास्थळावर आरोपी क्र. २ व ३ घटनेवेळेस असलेबाबत कथन करत नाही.<br>११) मेमोरेन्डम पंचनाम्याबद्दल शंका निर्माण होते. त्यासंदर्भात कोणतेही कारण देता येत नाही.<br>१२) मयताचा रक्तगट निष्पन्न करणारे पूरावे साक्षीदार यांनी रेकॉर्डवर आणले नाहीत त्यामुळे हत्यारावरील रक्त मयताचेच असल्याचे निष्पन्न होऊ शकले नाही.<br>१३) जप्ती पंचनामा सिध्द होणेबाबत अभियोग पक्षाने पंच आणले नाहीत.<br>१४) मुद्देमाल १७ दिवस उशिराने पाठविला त्यासंदर्भात कोणतेही कारण नाही. त्यामुळे बचावाचे उद्देशाने रक्ताचा नमुना हा उलटसलट होण्याची शक्यता झाली असल्याचे युक्तिवादात म्हटले आहे. ही तपासीक अंमलदार यांची जबाबदारी असतांना त्यांनी ती न केल्याने त्यांचेवर कसुरी अहवाल सादर करण्याची दक्षता घेतली आहे.<br>१५) अभियोग पक्ष मयताचे मृत्युची वेळ सिध्द करुन शकला नाही. वैदयकिय अधिकारी यांनी सांगितलेल्या साक्षीवर घटनाक्रम पुरक ठरत नाही. संशय निर्माण होतो.<br>१६) या सर्व गोष्टींमुळे आरोपीची अपराधी भावना सिध्द होऊ शकली नाही. तसेच ईतरदेखिल आरोपीच्या गुन्हयाची सलग्नता लावु शकले नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| | त.अ.चंकि | १) मेमोरंडम पंचनामा तपासीक अंमलदार यांनी पंचांसमक्ष करणे आवश्यक असतांना तो केला नसल्याचे व आरोपीवर दबाव टाकून सदर पंचनामा केल्याचे व त्यावर पंचांचे नंतर सहया घेतल्याचे मा. न्यायालयाने निकालपत्रात नमुद केले आहे.<br>२) गुन्हयाचे अनुषंगाने कोणतेही पूरक साक्षीदार तपासीक अंमलदार यांनी निष्पन्न केले नाहीत. त्यामुळे कोर्टाने न्यायालयिन प्रक्रियेचे वेळी अभियोग पक्षाव्दारे सादर केलेले साक्षीदार हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याचे कोर्टाचे मत झाले. त्यामुळे सदर मृत्यू हा खून की सदोष मनुष्यवध आहे हे सिध्द झाले नाही.<br>३) आरोपीच्या बायकोचे व मयताचे प्रेमसंबंध होते हे सिध्द होणेकामी तपासीक अंमलदार यांनी पूरावे रेकॉर्डवर आणले नाहीत.<br>४) मुद्देमाल १७ दिवस उशिराने पाठविला त्यासंदर्भात कोणतेही कारण नाही. त्यामुळे बचावाचे उद्देशाने रक्ताचा नमुना हा उलटसुलट होण्याची शक्यता झाली असल्याचे मा. न्यायालयाने निकालपत्रात स्पष्ट नमुद केले आहे.<br>एकंदरीत तपासीक अंमलदार यांनी गुन्हा सिध्द् होणेसाठी आरोपी विरुध्द पुरेसे पुरावे रेकॉर्डवर आणले नाहीत तसेच पुराव्यांची साखळी योग्य प्रकारे मांडली नाही. |

| अ.क्र. | मुद्दा | विवरण |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | **मुरबाड** |
| २ | निकाल लागलेले गुरनं व कलम | I ९४/०१ भादंविसंक ३०७,३२४,५०४,३४ |
| ३ | सरकारी अभियोक्ताचे नांव | श्रीमती आर. आर. भोईर |
| ४ | तपासीक अंमलदार | पोनिरी अे.आर. सुरवाडकर, पोउपनिरी शिंदे |
| ५ | से.के.नं. | ५४३/०१ |
| ६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक | १२/१०/०१ |
| ७ | निकाल दिनांक | २२/०८/२०१७ |
| ८ | सुटल्याचे कारण | १) गुन्हयात वापरण्यात आलेले घातक हत्यार सुरा व लोखंडी रॉड कोर्टासमोर सादर करण्यात आले नाही.<br>२) पंच, साक्षीदार व तपसीक अंमलदार साक्षीसाठी हजर नाहीत.<br>३) तपासीक अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा, कापसाने गोळा केलेला रक्ताचा नमुना, शेजारचे साक्षीदार, नातेवाईकांचे जबाब नोंदविण्यात आलेत. फिर्यादीचा जबाब, जखमांचा अहवाल घेतला आहे. भापुकाकलम २७ नुसार हत्यार जप्त होऊनही पंच व तपासीक अंमलदार कोर्टासमोर हजर न राहिल्याने साक्ष झाली नाही. म्हणुन फक्त intrested witness यांचे साक्षीवर विश्वासाहर्तता |

| | | |
|---|---|---|
| | | आरोपीच्या विरोधात ठेवता येणार नाही<br>४) एक छोटा मुलगा यात साक्षीदार आहे. परंतु त्याला कोर्टात साक्षीचे वेळी घटनेचा क्रम सांगता आला नाही.<br>५) केसला पुष्टी देण्यासाठी पुरेसा पुरावा उपलब्ध नाही.<br>६) पंच, तपासीक अंमलदार व डॉक्टर यांची साक्षी केसला पुष्टी मिळण्याकरिता आवश्यक होती. |
| | त.अं.चुकी | १) तपासीक अंमलदार साक्षीसाठी हजर राहिले नाही.<br>२) गुन्हयात वापरण्यात आलेले घातक हत्यार सुरा व लोखंडी रॉड असे आवश्यक पुरावे कोर्टासमोर सादर करण्यात आले नाहीत.<br>३) तपासामध्ये गुन्हा सिध्द करण्यासाठी तपासीक अंमलदार यांनी पुरेसे पुरावे रेकॉर्डवर आणले नाहीत. |

सोबत केसेसच्या निकालाच्या प्रती सादर करित आहोत.

(व्हि.आर.आंधळे)
पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा,
ठाणे ग्रामीण

APP
(व्हि.एस.जाधव)
सहा.सरकारी वकील व
अतिरिक्त सरकारी अभियोक्ता
ठाणे

(प्रशांत कदम)
अपर पोलीस अधीक्षक,
ठाणे ग्रामीण